महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
जिल्हा माहिती कार्यालय
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, 2 रा मजला, आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडी, अहमदनगर - 414003
फोन नं. (0241) 2411212 Email id - dionagar12@gmail.com
Blog : infoahmednagar.blogspot.com Twitter : @InfoAhmednagar

दै.सकाळ, अहमदनगर दि. 01 मार्च 2023

# अहमदनगर जिल्ह्यामध्ये मुलींचे प्रमाण घटले

## रूपाली चाकणकर : महिलांच्या तक्रारी सोडवण्याचे आढावा बैठकीत आवाहन

अहमदनगर, ता. २८ : जिल्ह्यात मुलींचे प्रमाण कमी आहे. मुलांच्या तुलनेत मुलींच्या लिंगगुणोत्तराचे प्रमाण वाढीसाठी मुलगा-मुलगी हा भेदभाव समाजातून नष्ट होण्याची गरज आहे. यासाठी प्रभावी कृती कार्यक्रम राबविण्यात यावा. सोनोग्राफी सेंटरच्या माध्यमातून अवैधरित्या स्त्रीभ्रूणहत्येचे प्रकार होत असतील तर या प्रकाराला आळा घालण्यासाठी छापे घाला. पीसीपीएनडीटी कायद्याची जिल्ह्यात काटेकोर अंमलबजावणी करा, अशा सूचना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात विविध विभागांच्या अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीचे आयोजन केले होते. त्याप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना श्रीमती चाकणकर बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ,



अहमदनगर : महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकरणकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी महिलांच्या समस्यांबाबत आढावा घेतला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव भाग्यश्री पाटील, महापालिका आयुक्त डॉ. पंकज जावळे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी वी.वी. वरूडकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे, जिल्हा संरक्षण अधिकारी दीपक पाटील, परिविक्षा अधिकारी संध्या राशिनकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी वैभव रमेश देशमुख आदी उपस्थित होते.

चाकणकर म्हणाल्या की, ग्रामीण भागातील महिलांना आयोगाच्या मुंबई कार्यालयात येऊन तक्रार करणे, सुनावणीसाठी 'प्रत्यक्ष उपस्थित राहणे आर्थिकदृष्ट्या तसेच इतर कारणामुळे शक्य होत नाही. "महिला आयोग आपल्या दारी" हा पान २ वर ›

### स्वच्छतागृह, सॅनिटरी नॅपकीन पुरवा

■ शालेय विद्यार्थीनीना शाळेमध्ये पिण्यासाठी पाणी, वैयक्तिक स्वच्छतागृह, सॅनिटरी नॅपकीन बँक, चेंजिंग रुम, तक्रारपेटी आदी सोयी-सुविधा प्राधान्याने उपलब्ध करा. मिशन वात्सल्य योजना, बालविवाह, उभारी कार्यक्रम, महिला ऊसतोड कामगारांचे प्रश्न, पीसीपीएनडीटी कायदा, मनोधैर्य योजना,माझी कन्या भाग्यश्री, गृह स्वाधार योजना, शासकीय वसतिगृहांसह जिल्हा कामगार अधिकारी, पोलीस अधीक्षक, समाजकल्याण, महिला व बालकल्याणसह इतर योजना व विभागांचा सविस्तर आढावाही चाकणकर यांनी घेतला.

### यांचे होते पॅनल

■ आयोगाच्या तीन पॅनलच्या सदस्यांनी महिलांच्या समस्या, त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. महिला आयोगाच्या सदस्या दिपीका चव्हाण, उत्कर्षा रुपवते, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, सीईओ आशिष येरेकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव भाग्यश्री पाटील, महापालिका आयुक्त डॉ. पंकज जावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नगरमध्ये मुलींचे प्रमाण घटले : रूपाली चाकणकर

› पान १ वरून

उपक्रम राबविण्यात येत आहे. महिलांच्या असलेल्या तक्रारी या उपक्रमातून प्रशासनापर्यंत पोहोचवत पीडीतेला न्याय देण्याचे काम करण्यात येत असले तरी स्थानिक पातळीवर महिलांच्या असलेल्या समस्या, तक्रारींची सोडवणूक होणे आवश्यक आहे.

महिलांवरील अत्याचाराला प्रतिबंधासाठी सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत निवारण तक्रार समिती करा. जिल्ह्यातील सर्व खासगी आस्थापनांची तपासणी करा. तेथे अशा प्रकारची समिती स्थापन केल्याची खातरजमा करावी. महिलांनी केलेल्या तक्रारींवर या समितीमार्फत तातडीने कार्यवाही व्हायला हवी. समाजामध्ये अनेक पिडित व एकल महिला आहेत.

Print to PDF without this message by purchasing novaPDF (http://www.novapdf.com/)

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
जिल्हा माहिती कार्यालय
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, 2 रा मजला, आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडी, अहमदनगर - 414003
फोन नं. (0241) 2411212 Email id - dionagar12@gmail.com
Blog : infoahmednagar.blogspot.com Twitter : @InfoAhmednagar

दै.दिव्यमराठी, अहमदनगर

दि. 01 मार्च 2023

बैठक • जिल्ह्यात महिलांच्या सुरक्षिततेसाठी मुस्कान केंद्र सुरू : महिला आयोगाच्या अध्यक्ष चाकणकर यांची माहिती

# १५२ महिलांनी मांडली आयोगाकडे आपली कैफियत

प्रतिनिधी | नगर

गौतमी पाटील व्हिडिओ व्हायरल प्रकरणी सावधर केलेल्या महिला आयोगाकडून सूचना देण्यात आली आहे. अशाप्रकारे महिलेचे चित्रीकरण करणे अत्यंत चुकीचे आहे.अशा पद्धतीने व्हिडिओ तयार करण्याचा कुणालाही अधिकार नाही. अहमदनगर जिल्ह्यात महिलांच्या सुरक्षिततेसाठी मुस्कान केंद्र असा उपक्रम सुरू करण्यात आला आहे, अशी माहिती महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी मंगळवारी दिली. दरम्यान, महिला आयोगाच्या तीन पॅनलकडे दिवसभरात १५२ महिलांनी तक्रारी मांडल्या , अशी माहिती सदस्या उत्कर्षा रुपवते यांनी दिली.

नगर जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र राज्य आयोगाच्या वतीने 'महिला आयोग आपल्या दारी'या महिलांच्या जनसुनावणीनंतर चाकणकर बोलत होत्या. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, पोलिस उपधीक्षक स्वाती भोर, महापालिका आयुक्त पंकज जावळे यावेळी उपस्थित होते.



पत्रकार परिषदेत बोलताना महिला आयोग अध्यक्ष रुपाली चाकणकर.

चाकणकर म्हणाल्या, महिलांसाठी अनेक कायदे आहेत मात्र, कायदे मोडणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे पोलिसांनी कारवाईचा बडगा उचलावा. दुबई, ओमन या देशांत महाराष्ट्रातील अनेक महिलांना रोजगारासाठी एजंट मार्फत नेण्यात आले आहे. तिथे गेल्यानंतर त्यांचे मोबाईल व पासपोर्ट काढून घेतले गेले. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे सह अनेक भागातील पाऊणेतीन हजार महिला या तिथे अडकल्या आहेत. त्यासाठी आम्ही परराष्ट्र मंत्रालय व भारतीय दुतावासाकडे पाठपुरावा करून पत्रव्यवहार केला आहे. एजंटांच्या माध्यमातून या महिलांना परदेशात घेऊन त्यांची फसवणूक करण्यात आली. त्यांचा प्रवास हा विदारक आहे, असे त्यांनी सांगितले.

कोपरगाव तहसीलदारांवर दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत त्या म्हणाल्या, अनेक महिलांनी आम्हाला निवेदन देऊन ते अधिकारी चांगले आहेत, आमचे कामे करतात, असे सांगितले आहे. याप्रकरणी आठ दिवसात आढावा घेतला जाईल. पुणे महापालिकेत हिरकणी कक्ष कागदावर होता मात्र पाठपुराव्यानंतर तो सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यात शिक्षण विभागाबाबत नाराजी व्यक्त करून त्या म्हणाल्या की मुली व महिलांच्या स्वच्छतागृहाचा मोठा प्रश्न आहे. तिथे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे असे त्यांनी सांगितले. महिला आयोगाच्या पॅनलकडे जिल्हाभरातील १५२ महिलांनी आपल्या तक्रारी मांडून न्याय देण्याची मागणी चाकणकर यांच्याकडे केली.

### अवैध गर्भपात होत असल्यास आठ दिवसांत कारवाई करा

जिल्ह्यात २८३ गर्भपात केंद्रे आहेत. अवैधरित्या गर्भपात सेंटर सुरू असल्यास आठ दिवसांत कारवाई करून अहवाल सादर करावा. जिल्ह्यात २०२२-२३ या वर्षात २६६ बलात्कारांच्या घटना घडल्या आहेत. बालविवाहात लोकप्रतिनिधी उपस्थित असतील तर कायद्यात बदल करण्याची आवश्यकता आहे, असे चाकणकर यांनी सांगितले.

Print to PDF without this message by purchasing novaPDF (http://www.novapdf.com/)

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
जिल्हा माहिती कार्यालय
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, 2 रा मजला, आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडी, अहमदनगर - 414003
फोन नं. (0241) 2411212 Email id - dionagar12@gmail.com
Blog : infoahmednagar.blogspot.com Twitter : @InfoAhmednagar

दै.पुढारी, अहमदनगर दि. 01 मार्च 2023

# महाराष्ट्रातील महिलांची तस्करी

## आयोगाच्या अध्यक्षा चाकणकर : सुटकेसाठी 'परराष्ट्र'कडे पाठपुरावा सुरु

पुढारी ANCHOR

नगर : पुढारी वृत्तसेवा

राज्यभरातील जवळपास अडीच ते पावणेतीन हजार मुली व महिलांची दुबई व ओमान देशात मानवी तस्करी झालेली आहे. या महिलांची सुखरूप सुटका व्हावी, यासाठी राज्य महिला आयोगाचे प्रयत्न सुरु आहेत. याबाबत परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधला असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी सांगितले. या महिलांच्या सुटकेसाठी राज्य शासनाने देखील पुढाकार घ्यावा असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर मंगळवारी जिल्हा दौऱ्यावर आल्या. जनसुनावणी झाल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, झेडपी सीईओ आशिष येरेकर उपस्थित होते.

नोकरी व इतर काही कारणास्तव मुली व महिला दुबई व इतर देशात एंजटामार्फत जात असतात. लॉकडाऊनच्या कालावधीत मुली व महिला ओमान व दुबईत अडकल्या आहेत. त्यापैकी एका महिलेचा व्हिडिओ आयोगाकडे आला होता. त्याबाबत तत्काळ मुंबईतील पोलिस स्टेशनशी संपर्क साधला. त्यानुसार तपासणी केली असता ती महिला त्या ठिकाणी आढळून आली नाही. या महिलांचे फोन, कागदपत्रके काढून त्यांना डांबून ठेवण्यात आले आहे. या डांबून ठेवलेल्या महिलांची सुटका व्हावी, यासाठी महिला आयोगाने परराष्ट्र मंत्रालयाकडे तीनदा पत्रव्यवहार केला असून अद्यापपाठपुरावा सुरु आहे.

बालविवाह रोखण्यासाठी फक्त सरकारी यंत्रणांनी नव्हे तर सर्वसामान्य जनतेने देखील सतर्क राहावे. यापूर्वी बालविवाह आढळून आल्यास आता सरपंच व इतर कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल केला जावा, असा प्रस्ताव आयोगाने शासनाकडे पाठविलेला आहे.सध्या कायदा मोडण्यासाठी स्पर्धा आहे.

नागरिकांनी कायद्याचे पालन व्हावे, यासाठी पुढे यावे असे आवाहन त्यांनी केले.

### ३७ टक्के महिलांचा छळ

नोकरी करणाऱ्या ३७ टक्के महिलांचे लैंगिक छळ केला जात असल्याचा आरोप महिला आयोगाच्या अध्यक्षा चाकणकर यांनी केला. याप्रकरणी जिल्ह्यात तक्रारींसाठी आयसीसी समिती नियुक्त केली आहे का, याचा अहवाल आठ दिवसांत पोलिसांनी सादर करावा असे निर्देश त्यांनी दिले. कोपरगाव तहसीलदारांविरोधात तक्रारी आल्या आहेत. तसेच त्यांच्या समर्थनार्थ काही महिलांचे शिष्टमंडळ येऊन भेटले. कायद्याचा वापर चुकीच्या पद्धतीने होणार नाही, याची काळजी संबंधित यंत्रणेने करावी.

Print to PDF without this message by purchasing novaPDF (http://www.novapdf.com/)